# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/2022-23/ 01 / of 2023**

**परिपत्रक:**

विषय: शैक्षणिक वर्ष २०२४—२५ ते २०२८—२९ करिता मुंबई विद्यापीठाचा बृहत आराखडा तयार करण्याकरिता विविध सामाजिक घटकांकडून सूचना प्राप्त करणेबाबत.

संदर्भ : क्र. बृहत २०२३/प्र क्र. ०५/वि शि ५
दिनांक १६ जानेवारी, २०२३

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व सन्माननिय विद्यापीठ प्राधिकरणांचे सदस्य/ लोकप्रतिनिधी, शिक्षणतंज्ञ, संस्थाचालक, उदयोजक, पालक, विद्यार्थी व इतर सामाजिक घटक यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ कार्यक्षेत्र अंतर्गत विद्यापीठाच्या ''शैक्षणिक वर्ष २०२४—२५ ते २०२८—२९'' वर्षाच्या बृहत आराखड्यामध्ये विविध अभ्यासक्रम व ठिकाणे समाविष्ट करावयाचे आहेत. सबब विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी नविन महाविद्यालय व अभ्यासक्रमाबाबत प्रस्तावित ठिकाणच्या शैक्षणिक गरजा, भौगोलिक परिसर, लोकसंख्या, सामाजिक परिस्थिती इत्यादी तसेच डॉ. नरेंद्र जाधव समितीने केलेल्या सुचनांच्या अनुषंगाने व बदलते तंत्रज्ञान, काळाची गरज तसेच आदिवासी, डोंगराळ/ दुर्गम भागातील गरजा व अडचणी यांचा विचार करुन आपण व्यवसाय तथा रोजगाराभिमूख अभ्यासक्रमांना प्राधान्य देत आपल्या सविस्तर सुचना **https://wahgi.ncog.gov.in/MaharashtraEducation/suggestionForm** या संकेत स्थळाचा वापर करुन ऑनलाईन उपलब्ध केलेल्या प्रश्नावली मार्फत आपल्या अमुल्य सुचना सादर करावे. ही विनंती.

मुंबई—४०० ०३२
०३ एप्रिल, २०२३

for उपकुलसचिव
महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग